# महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्या.

## स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग, सोलापूर

## स्वारस्य अभिरूची

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित हयांचे अंतर्गत मौजे वागदरी, तालुका- अक्कलकोट जिल्हा- सोलापूर येथे महापारेषण कंपनीचे ४००/२२० के.व्ही. उपकेंद्राचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्याकरिता खाजगी मालकी हक्काची जमिन चौरस अथवा आयताकृती आकाराची अंदाजे २५ ते ४० एकर क्षेत्रफळ असलेली अशी जड वाहतूक होण्यायोग्य रस्त्यालगत जमिनीची आवश्यकता आहे. उपरोक्त जमीन मौजे वागदरी, (१७ अंश ३७ मिनिट २२.८ सेकंद अक्षांश व ७६ अंश १९ मिनिट ५५.३ सेकंद रेखांश) तालुका- अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर या अक्षांश-रेखांश पासून ०३ कि.मी. अंतराच्या आत असावी. वरील वर्णनाची जमीन विक्री करण्यास इच्छुक असणा-या जमीन धारकांनी अथवा जमीन कुलमुखत्यार धारकांनी खाली नमुद केलेल्या जमिनी संबंधित कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह स्वारस्य अर्ज निम्ननिर्देशित कार्यालयास बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.

संबंधीत जमिनीचे भूसंपादन हे महाराष्ट्र शासनाच्या 'खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबत आवश्यक जमिन शासन, महसुल व वन विभागाकडील निर्णय क्रं.संकिर्ण/०३/२०१५ प्र.क्र.३४/अ/२, दि.१२.०५.२०१५ क्रं.संकिर्ण/०३/प्र.क्र.३४/अ/२, दि.३०.०९.२०१५ व परिपत्रक एल.क्यु.एन.०१/२०१७/प्र.क्र./१२/अ/२, दि.२५.०१. २०१७ मध्ये विषद केलेल्या कार्यपद्धतीनुसार खाजगी जमिन सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेकामी प्रस्तावित केले आहे.

अर्जासोबत बंद लिफाफ्यामध्ये द्यावयाची कागदपत्रे...

१. अदयावत ७/१२ उतारा
२. खसरा नकाशा गाव नकाशासाहित
३. गाव नमुना ८ अ / ६ अ
४. टोच नकाशा (लोकेशन मॅप)
५. १५ वर्षाच्या कलावधीसाठी मान्यंता प्राप्त वकीलातर्फे टायटल सर्च रिपोर्ट
६. स्वारस्य अभिरूची प्रस्तावा अंतर्गत जमिन क्षेत्रावर असलेला बोजा तपशिल
७. जमिन धारकाने धारण केलेल्या जमिनीचा एकूणे क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
८. जमिनीची लांबी, रूंदी व एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
९. जमिन जर कोणत्याही प्रकल्पात किंवा इतर कारणात्सव आरक्षित असल्यास जिल्हाधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा जिल्हाधिकारी परवानगीसाठी त्यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या सेतू मार्फत अर्जाची प्रत अथवा पुरावा.

जमिन धारकाने अथवा जमिन कुलमुखत्यार धारकाने आपले स्वारस्य अर्ज, दिनांक- १८/०९/२०२५ पर्यंत १७:०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये वरील क्रं ०१ ते ०९ प्रमाणे जमीनीचे कागदपत्रे असे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हयांच्या खाली दिलेल्या पत्यावर स्वहस्ते किंवा प्रतिनिधी मार्फत पोहचतील अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणामुळे उशिरा प्राप्त होणारे स्वारस्य अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कारण न देता कोणतेही किंवा सर्व स्वारस्य अर्ज नाकारण्यात येण्याचा हक्क हस्ताक्षर कर्त्या अधिका-याने राखून ठेवला आहे.

संपर्क अधिकारी प्रिती शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था) (प्रभारी), सोलापूर. मोबाईल नंबर- ८८५६०१०३१४. अधिक माहितीसाठी या संकेत स्थळावर संपर्क करा- www.mahatransco.in

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा.बां.नि.व.सु., विभागीय कार्यालय,
वैशंपायन वैदयकिय महाविदयालय शेजारी,
रंगभवन, सोलापुर – ४१३००३

---